## शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (मर्या.)

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**जिल्हा कार्यालय, सिंधुदुर्ग.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ( अे ) विंग,**

**तळमजला,सिंधुदुर्गनगरी,ता-कुडाळ,जिल्हा-सिंधुदुर्ग, फोन-02362/228119.**

---

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ लि. च्या सिंधुदुर्ग येथील जिल्हा कार्यालयामार्फत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र व्यक्तींचा आर्थिक स्तर उंचावण्याकरीता तसेच त्यांच्या सर्वागिण कल्याण व विकासासाठी स्वयंरोजगाराकरीता अल्प व्याजदराने अर्थसहाय करण्याच्या विविध योजना राबबिते.

गरजू इतर मागासवर्गीय लाभार्थीना स्वयंरोजगाराकरीता खालील राज्य शासनाच्या योजना राबविण्यात येतात.

- **राज्य महामंडळाच्या कर्ज योजना**

**1) 20% बीज भांडवल योजना :**- प्रकल्प मर्यादा रु.5 लक्ष पर्यत. महामंडळाचा सहभाग 20% बॅकेचा सहभाग 75%, लाभार्थी सहभाग 5%. महामंडळाच्या कर्जावरील व्याज 6% .बॅकेच्या रक्कमेवरील व्याज बॅकेच्या दराप्रमाणे. कर्ज परतफेड कालावधी 5 वर्षे.

- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** –

- तहसिलदार / नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पनाचा मुळ दाखला .
- ग्रामीण व शहरी भागातील लाभर्थीच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.1 लक्ष .
- सक्षम अधिका-याने दिलेले इतर मागासवर्गीय जातीचे प्रमाणपत्र .
- शिधापत्रिकाची छायांकित प्रत , निवडणूक ओळखपत्र / आधार कार्डाची छायंकित प्रत.
- पासपोर्ट साईझ दोन फोटो.
- वयोमर्यादा 18 ते 50 वर्ष. वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्म तारखेचा दाखला .
- विशिष्ट ठिकाणी व्यवसाय करणा-या लाभार्थी करीता व्यवसाय स्थळाची भाडेपावी करारनाम , 7/12 उतारा
- प्रकल्प अहवाल व दरपत्रक
- स्थानिक स्वराज्य संस्थेचा व्यवसाय ना-हरकत दाखला.(ग्रामसेवकची स्वाक्षरी आवश्यक )
- **मुळ प्रमाणापत्रे अर्जासोबत न जोडता त्याच्या स्वसाक्षांकित झेरॉक्स 2 प्रती जोडाव्यात. मुळ प्रमाणपत्रे पडताळणी करीता दाखवावीत.**

**टिप – कर्ज मंजुरीनंतर महामंडळाच्या नियमाप्रमाणे वैधानिक कागदपत्रे करावी लागतील .**

**सदर योजनांच्या कर्ज मागणी अर्जाची विक्री जिल्हा कार्यालयाच्या वरील पत्तावर सुरु आहे.**

## 2) राज्य महामंडळाची रु.25000/- थेट कर्ज योजना (सन 2015-16)

- **उद्देश** –
  - इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरीबातील गरीब व अत्यंत गरजू व्यक्तीपर्यत महामंडळाच्या योजनेंचा लाभा पोहचविणे .
  - किरकोळ व छोटे व्यवसाय ( जसे नारळविक्री,किराणा दुकान, मेणबत्ती बनविणे, फळ विक्री, फिरता विक्री व्यवसाय, मच्छी विक्री,अन्य तांत्रिक लघु व्यवसाय इत्यादी ) या करीता रू.25,000/- पर्यतचे थेट कर्ज .
  - बॅकेमार्फत कर्ज मंजूर न करता येणा-या अडचणी व कर्ज वितरणास होणारा विलंब टाळणे .
- **व्याज दर व कर्जाची परतफेड** –
  - द.सा.द.से 2 % दराने व्याज दर . त्रैमासिक हप्त्यात तीन वर्षात धनादेशाव्दारे अथवा रोखीने
- **व्यवसाय** –
  - सर्व कायदेशीर किरकोळ व छोटे व्यवसाय .
- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** –
  - तहसिलदार / नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पनाचा मुळ दाखला .
  - ग्रामीण व शहरी भागातील लाभर्थीच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.1 लक्ष .
  - सक्षम अधिका-याने दिलेले इतर मागासवर्गीय जातीचे प्रमाणपत्र .
  - शिधापत्रिकाची छायांकित प्रत , निवडणूक ओळखपत्र / आधार कार्डाची छायंकित प्रत.
  - पासपोर्ट साईझ दोन फोटो.
  - वयोमर्यादा 18 ते 50 वर्ष. वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्म तारखेचा दाखला .
  - विशिष्ट ठिकाणी व्यवसाय करणा-या लाभार्थी करीता व्यवसाय स्थळाची भाडेपावी करारनाम , 7/12 उतारा
  - बॅकेच्या बचत खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत .
  - मुळ प्रमाणापत्रे अर्जासोबत न जोडता त्याच्या स्वसाक्षांकित झेरॉक्स 2 प्रती जोडाव्यात. मुळ प्रमाणपत्रे पडताळणी करीता दाखवावीत.

- **<u>वैधानिक  कागदपत्रे</u>** –
    - कर्जादाराला दोन जामिनदार दयावे लागतील. दोन जामिनदारांपैकी एक शासकिय / निमशासकिय/ सहकार क्षेत्रात कार्यरथ वेतन चिठठी धारक व दुसरा साधा जामिनदार असावा. अथवा कर्जदार किंवा जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेवर( 7/12 किंवा नमुना 8 अ)  कर्ज रक्कमेचा बोजा नोंद .
    - विहित नमुन्यातील करारनामा / जामिनपत्र रु.100/-  च्या स्टॅप पेपरवर .
    - लाभार्थीच्या बचत खाते असलेल्या बॅकेचे धनादेश पुस्तक
    - नमुना क्र.8 व 9 रु.1 च्या रेव्हेन्यु स्टॅपवर.

**सदर योजनांच्या कर्ज मागणी अर्जाची विक्री जिल्हा कार्यालयाच्या वरील पत्तावर सुरु आहे.**

सिंधुदुर्ग जिल्हयातील गरजू  इतर मागासवर्गीय लाभार्थीनी महामंडळांच्या वरील  योजनांचा लाभ घेण्यास या महामंडळाचे कार्यालयात खालील ठिकाणी  संपर्क साधावा, असे आवाहन **श्री.एन.पी.साळसकर,जिल्हा व्यवस्थापक सिंधुदुर्ग** यांनी केले आहे.